International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# भारतीय साहित्यातील मराठी साहित्यीकांचे योगदान

कु. सुनीता ना. येटरे

स्कुल ऑफ स्कॉलर्स, यवतमाळ

सारांश :

साहित्य याचा अर्थ सामग्री असा आहे. मराठी साहित्य परंपरेची समृद्ध सुरूवात महानुभवीय ग्रंथांपासून व सोबतच भागवत संप्रदायाचे संस्थापक असलेल्या ज्ञानदेवांच्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथापासून झाली.

बिज शब्द : साहित्य, महानुभाव, अष्टपैलू, आत्मकथा, ललित.

प्रस्तावना :

भारतीय साहित्य विश्वामध्ये मराठी साहित्याचे एक वेगळे स्थान आहे. मराठी साहित्याला हे स्थान मिळवून देण्यासाठी अनेक मराठी साहित्यीकांनी आपले अमुल्य असे योगदान दिले आहे. आज संपूर्ण देशामध्ये मराठी साहित्याला जे मानाचे स्थान आहे, ते मिळवून देण्यासाठी अनेक साहित्यीकांनी आपले योगदान दिले आहे. त्यापैकीच काही साहित्यीकांच्या कार्याचा अभ्यास आपण या संशोधन लेखामध्ये करीत आहोत.

1) पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे : (जन्म - 8 नोव्हेंबर 1919, मृत्यु - 12 जून 2000)

मराठी साहित्याबद्दल बोलताना डोळ्यांसमोर पहिलं नाव येतं ते म्हणजे पु. ल. देशपांडे. महाराष्ट्रामध्ये त्यांना 'पु. ल.' असंच संबोधलं जातं. त्यांना 'भाई' या टोपण नावानेही संबोधले जाते. त्यांनी एल. एल. बी. ही पदवी मुंबईत पूर्ण केली. त्यानंतर त्यांनी पुण्यातून बी. ए. आणि सांगलीमधून एम.ए. या पदव्या पुर्ण केल्या. त्यांनी कर्नाटक आणि मुंबई मध्ये प्रोफेसर म्हणूनही काम केले.

आपल्या खास विनोदी शैलीतून पु. ल. नी मराठीमध्ये खुपसे लिखाण केले. फक्त लेखक म्हणूनच नाही तर त्यांनी अभिनेता, दिग्दर्शक, पटकथा लेखक, संगीतकार आणि नाटककार अशा अनेक रूपात स्वत:ची छाप मराठी साहित्यावर सोडली. त्यांनी मराठीच नाही तर हिंदी आणि इंग्रजी चित्रपटांमध्येही काम केले आहे.

प्रसिद्ध पुस्तके :

खोगीभरती, नस्ती उठाठेव, बटाट्याची चाळ, गोळा बेरीज, पूर्वरंग, असा मी असामी, व्यक्ती आणि वल्ली, हसवणूक, खिल्ली, कोट्याधीश, पु.ल., उरलं सुरलं, पुरचुंडी.

त्यांना त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल अनेक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे, ते म्हणजे – कालिदास सन्मान पुरस्कार-1988, पद्मभूषण-1990, पुण्यभूषण-1993, पद्मश्री - 1996, तसेच महाराष्ट्र गौरव पुरस्कार, महाराष्ट्र भूषण पुरस्कार, इ.

2) भालचंद्र नेमाडे : (जन्म - 27 मे 1938)

भालचंद्र नेमाडे यांचा जन्म 27 मे 1937 रोजी जळगाव जिल्ह्यातील सांगली, ता. यावल या ठिकाणी झाला. त्यांनी फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथे बी.ए. आणि डेक्कन कॉलेज, पुणे मधून भाषाशास्त्र या विषयामधून एम.ए. पूर्ण केले. पुढे त्यांनी मुंबई विद्यापीठातून इंग्रजी साहित्यामध्ये एम.ए. केले.

मराठी साहित्यातील एक ज्येष्ठ कादंबरीकार, समिक्षक आणि कवी म्हणून भालचंद्र नेमाडे यांना ओळखले जाते. त्यांच्या लेखनातून परखडपणा आणि देशीवाद ठळकपणे दिसून येतो. वयाच्या 25 व्या वर्षी त्यांनी 'कोसला' या कादंबरीमधून खेड्यातून पुण्यामध्ये शिक्षणासाठी आलेल्या तरूणाची आत्मकथा मांडली. ही कादंबरी प्रचंड लोकप्रिय झाली. नेमाडे यांना 2015 साली भारतीय साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा 'ज्ञानपीठ' पुस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कोसल, बिढार, हिंदू जगण्याची समृद्ध, अडगळ, जरीला झूल ह्या त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्या. मेलडी, देखणी हा त्यांचा कविता संग्रह सुद्धा अत्यंत प्रसिद्ध आहे. त्यांना त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, यशवंतराच चव्हाण पुरस्कार देण्यात आला.

3) विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) : (जन्म - 27 फेब्रुवारी 1912, मृत्यु – 10 मार्च 1999)

कुसुमाग्रज यांनी कवी, लेखक, नाटककार, कथाकार, कादंबरीकार व समिक्षक अशा अने रूपांत मराठी साहित्यामध्ये आपले अमूल्य असे योगदान दिले. त्यांचे पूर्ण नाव विष्णू वामन शिरवाडकर आहे. परंतु त्यांनी कुसुमाग्रज याच नावाने लेखन केले. कुसुमाग्रज यांना आधुनिक युगाचे कवी म्हणूनही ओळखले जाते. त्यांचे प्राथमिक शिक्षण नाशिकमध्ये झाले.

कुसुमाग्रजांची कविता, नाटक, कादंबरी अशा अनेक प्रकारच्या लिखाणातून मराठी भाषेला अमूल्य असा ठेवा दिला. आजही कुसुमाग्रजांच्या 'कणा' या कवितेतून 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा' या ओळी, संकटात अडकलेल्या अनेकांना कठीण परिस्थितीशी लढण्याचे बळ देतात. मराठी साहित्यामधील त्यांच्या योगदानामुळे त्यांचा जन्मदिवस 27 फेब्रुवारी 'मराठी भाषा गौरव दिन' किंवा 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा केला जातो.

कुसुमाग्रजांचे दुसरा पेशवा, ययाति हे नाटक प्रसिद्ध आहे. अंतराळ, एकाकी तारा, प्रेम आणि मांजर, फुलवाली हे कथासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

4) प्रल्हाद केशव अत्रे (प्र. के. अत्रे) : (जन्म - 13 ऑगस्ट 1898, मृत्यु – 13 जुन 1969)

प्रल्हाद केशव अत्रे म्हणजे महाराष्ट्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्व. लेखक, कवी, नाटककार, शिक्षणतज्ञ, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, पटकथा लेखक, राजकीय नेते आणि उत्कृष्ट वक्ते अशा अनेक रूपांत त्यांनी महाराष्ट्रावर आपला ठसा उमटवला आहे. प्र. के. अत्रे यांनी 'मकरंद' आण 'केशवकुमार' या टोपण नावांनी काव्यलेखन केले.

'श्यामची आई' या त्यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटाला 1954 साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. झेंडूची फुले, गीत गंगा हा कवितासंग्रह, अशा गोष्टी अशा गंमती, कावळ्यांची शाळा, फुले आणि मुले, बत्ताशी हे कथासंग्रह, तसेच ........चे पाणी खंड एक ते पाच हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहेत. तसेच अत्र्यांनी लिहिलेली अशी बायको हवी, उद्याचा संसार, एकच प्याला, तो

मी नव्हेच, लग्नाची बेडी, मोरूची मावशी, इ. नाटके प्रसिद्ध आहेत. आपल्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांना 'विष्णुदास भावे' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

5) विष्णू सखाराम खांडेकर (वि. स. खांडेकर) : (जन्म - 18 जानेवारी 1898, मृत्यु - 2 सप्टेंबर 1976)

वि. स. खांडेकर हे मराठीतील एक थोर कथा-कादंबरीकार, लघुनिबंधकार आणि समिक्षक होते. वि. स. खांडेकरांच्या कथाकादंबऱ्यांचे भारतातील अनेक भाषांमध्ये भाषांतर झाले आहे. त्यांच्या 'ययाती' या कादंबरीसाठी भारतीय साहित्यातील सर्वोच्च असा 'ज्ञानपीठ' पुरस्कार त्यांना मिळाला आहे. हृदयाची हाक, कांचनमृग, उल्का, हिरवा चाफा, दोन मने, रिकामा देव्हारा, पांढरे ढग, सुखाचा शोध, पहिले प्रेम, फळलेला मोहर, ययाति ह्या कादंबऱ्या, तसेच नवमालिका, पाकळ्या, समाधीवरली फुले, नवा प्रात:काल, इ. कथासंग्रह सुप्रसिद्ध आहेत. त्यांना साहित्य जगतातील त्यांच्या अमुल्य योगदानाबद्दल साहित्य अकादमी पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार, ज्ञानपीठ पुरस्कार, इ. पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

6) वसंत पुरूषोत्तम काळे (व. पु. काळे) : (जन्म - 23 मार्च 1932, मृत्यु - 26 जुन 2001)

वसंत पुरूषोत्तम काळे हे मराठीतील एक चांगले लेखक, कथानककार, कादंबरीकार होते. त्यांना व. पु. असेच संबोधले जाते. ते पेशाने एक वास्तूविशारद होते. त्यांनी 60 पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. व. पु. चे लेखन हे वैचारिक होते. त्यांच वैचारिक साहित्य आजही अनेकांना आपलसं वाटतं. त्यांचे विचार एवढे प्रसिद्ध आहेत की आजही व्हाट्स ॲप, फेसबुक, मेसेजेस द्वारे प्रसारीत होतात.

त्यांच्या आपण सारे, अर्जून, गुलमोहर, घर हरवलेली माणसं, दोस्त, मी माणूस शोधतोय, गोष्ट हातातली होती, इ. कथासंग्रह तसेच तप्तपदी, ठिकरी, पार्टनर, ही वाट एकटीची, इ. कादंबऱ्या, त्यांची व्यक्तिचित्रे आणि पत्रसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाचा उत्तम लेखकाचा पुरस्कार, पु. भा. भावे पुरस्कार, फाय फाऊंडेशनचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

7) रणजीत रामचंद्र देसाई : (जन्म - 8 एप्रिल 16928, मृत्यु - 6 मार्च 1992)

रणजीत देसाई हे कथालेखक, नाटककार आणि एक उत्कृष्ठ कादंबरीकार होते. कोल्हापूरातील द्वारमधून त्यांचे कथालेखन प्रसिद्ध होत असे. मराठीतील ऐतिहासिक साहित्याचा विषय येतो, तेंव्हा रणजीत देसाई यांच्या 'स्वामी' आणि 'श्रीमान योगी' या कादंबऱ्या आवर्जून आठवतात. श्रीमान योगी ही कादंबरी छत्रपती शिवाजी महाराजांवर आहे. स्वामी ही कादंबरी थोरले माधवराव पेशवे यांच्या जीवनावर घेतलेली आहे. या कादंबरीमुळे रणजीत देसाई यांना 'स्वामीकार' म्हणूनही ओळखले जाते. रूप महाल, मधूमती, जल कालवा, गंधाली, अलख, मोरपंखी, सावल्या, कातळ, मेघा, वैशाखी, आषाढ, इ. कथासंग्रह, तसेच तंबोरी, माझे गाव, स्वामी, श्रीमान योगी, अभोगी, प्रतीक्षा, राधेय या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्याच्या या योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री, महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

8) शिवाजी सावंत : (जन्म - 31 ऑगस्ट 1940, मृत्यु - 18 सप्टेंबर 2002)

शिवाजी सावंत यांचे नाव येताच आठवते ती 'मृत्युंजय' कादंबरी. महाभारतातील कर्णाच्या जीवनावर आधारलेली ही कादंबरी खूपच लोकप्रिय आहे. शिवाजी सावंत यांच्या आणखी एका कादंबरीचे नाव आवर्जून घ्यावेसे वाटते, ती म्हणजे 'छावा'. या कादंबरीमधून त्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांचे खरे

चरित्र लोकांसमोर आणले. त्यांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार, असे अनेक देवून गौरविण्यात आले.

9) विजय तेंडूलकर : (जन्म - 6 जानेवारी 1928, मृत्यु - 19 मे 2008)

शिक्षणात फारसे मन रमत नसल्यामुळे त्यांनी वयाच्या 15 व्या वर्षी शिक्षण सोडून एका ग्रंथविक्रेत्याकडे काम करण्यास सुरूवात केली. त्यानंतर ते पत्रकारीतेच्या क्षेत्रात वळले. तेंडुलकरांनी मराठा, लोकसत्ता, दैनिक नवभारत यासारख्या वर्तमानपत्रात उपसंचालक पादक म्हणून काम केले होते. नाटक, पटकथा, बालनाट्य ललित लेखन, अशा अनेक प्रकारांत लिखान केले. ‘ढाई पन्ने’, शांतता ! कोर्ट चालू आहे, घोसीराम कोतवाल आणि सखाराम बाईंडर ही त्यांची काही गाजलेली नाटके आहेत. ‘मंथन’ या चित्रपटाच्या पटकथेसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्यांचे अनेक नाटक जसे कन्यादान, कमला, हट्टी मुलगी, चिमणीचं घर, तसेच बालनाट्य बाबा हरवले आहेत, पाटलाच्या पोरीच लगीन, चिमणा बांधतो बंगला, इ. बालजगतात अजरामर झाले आहेत.

10) गजानन दिगंबर माडगूळकर (ग. दि. माडगूळकर) :
(जन्म - 1 ऑक्टोबर 1919, मृत्यु – 14 डिसेंबर 1977)

गजानन दिगंबर माडगूळकर यांना ‘ग.दि.मा.’ असेही संबोधले जाते. गदिमांनी कवी, गीतकार, पटकथा लेखक, कादंबरीकार अशा अनेक रूपात मराठी साहित्यात आपले योगदान दिले आहे.

‘गीतरामायण’ ही गदिमांनी मराठी साहित्याला दिलेली एक अतूलनीय अशी देणगी आहे. गीतरामायणाला मराठी रसिकांनी खूप प्रेम दिले आणि त्यांचे शेकडो प्रयोग झालेत. कृष्णाची करंगळी, तुपाचा नंदादीप, चंदनी उदबत्ती हे त्यांच्या कथासंग्रह, आकाशाची फळे ही कादंबरी, मंतरलेले दिवस आणि वाटेवरल्या सावल्या, इ. प्रसिद्ध जोगिया, चार संगीतिका, काव्यकथा, इ. कविता प्रसिद्ध आहेत. मराठी साहित्य जगतात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल ते पद्मश्री, विष्णुदास भावे, इत्यादी अनेक पुरस्कारांचे ते मानकरी ठरले.

निष्कर्ष :

साहित्यातून वास्तवाचे दर्शन घडत असते, हे यातून सिद्ध होते. आज या सर्व साहित्यीकांच्या योगदानामुळे मराठी साहित्य जागतिक पातळीवर पोहचले आहे.

संदर्भ सूची :

1. साहित्य विचार – प्रा. अ. वा. कुलकर्णी.
2. साहित्याचे स्वरूप आणि शोध – नागनाथ कोथापल्ले.
3. www.marathiworld.com